सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १३२ | सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४

अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

### आजचे अभीष्टचिंतन





**श्री. रावसाहेब पाटील**
गट शिक्षण अधिकारी



**श्री. योगेश कोठारी**
अमळनेर



**श्री. संदीप बोरसे**
शिक्षक

### दिनविशेष
०२ फेब्रुवारी

- जागतिक पाणथळ भूमी दिन

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## संत शिरोमणी श्री रविदास महाराज जयंती



















*अमळनेर : (१) संत शिरोमणी श्री रविदास महाराज जयंतीनिमित्त श्री मरिमाता मंदिरापासून शोभायात्रेस झालेला प्रारंभ. (२) संत शिरोमणी श्री रविदास महाराजांची पालखी. (३) संत शिरोमणी श्री रविदास महाराज मंदिरात पूजन करताना ज्येष्ठ समाजबांधव व पुरोहित शुभम वैष्णव. (४) मंदिरात दर्शन घेताना महिला भाविक. (५) दगडी दरवाजाजवळ भव्य मिरवणुकीचे टिपलेले छायाचित्र. (६) पालखीत सहभागी समाजबांधव. (७) पालखीचे दर्शन घेताना महिला भाविक. (८) व (९) पालखी मिरवणुकीत सहभागी महिला व मुली.*
(छायाचित्रे : मयूर चौधरी)

# संत शिरोमणी श्री रविदास महाराज जयंतीनिमित्त ‘एक गाव एक मिरवणूक’ जल्लोषात...!!

### महिलांची उपस्थिती ठरली लक्षणीय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संत शिरोमणी श्री रविदास महाराज यांच्या ६४९व्या जयंतीनिमित्त अमळनेर शहर व तालुक्यातील समस्त चर्मकार समाजाने एकजूट करून एक गाव एक मिरवणुकीची आदर्श प्रथा येथे प्रथमच सुरू केली. यापूर्वी शहर व तालुक्यात वेगवेगळ्या ठिकाणाहून वेगवेगळ्या मिरवणुका निघत होत्या. मरिमाता मंदिराजवळील संत शिरोमणी श्री रविदास महाराज यांच्या मंदिरापासून शोभायात्रेस प्रारंभ झाला. यावेळी त्या परिसरातील माजी नगरसेवक पांडुरंग शिंगाणे व विनोद लांबोळे उपस्थित होते.

सर्वप्रथम मंदिरात समाजातील सर्व ज्येष्ठ बांधवांच्या हस्ते व महाराजांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर समाजातील सर्व माता-भगिनींनी पूजन केले. सर्वांना प्रसाद वाटप झाले. तेथून संत शिरोमणी श्री रविदास महाराज की जयची जोरदार घोषणाबाजी होवून शोभायात्रेस प्रारंभ झाला. शोभायात्रा माळीवाडा, भोई वाडा, कसाली मोहल्ला, वाडी चौक, सराफ बाजार, दगडी दरवाजा, मोठा बाजार, राणी लक्ष्मीबाई चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकमार्गे गांधलीपुरा येथे आल्यानंतर तेथील संत शिरोमणी श्री रविदास महाराज यांच्या मंदिरात पूजनाचा कार्यक्रम झाला. तेथे देखील शोभायात्रेत उपस्थित सर्वांनी पूजन व दर्शनाचा लाभ घेतला.

दरम्यान, शोभायात्रा मार्गावरील सर्व देवस्थान व महापुरूषांच्या प्रतिमा आणि पुतळ्यांना माल्यार्पण तथा पूजन करण्यात आले. गांधलीपुरा येथून शोभायात्रा पुन्हा श्री मरिमाता मंदिराजवळील महाराजांच्या मंदिराजवळ पोहोचल्यावर तेथे मिरवणुकीची सांगता झाली.

नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, गटनेते पंकज चौधरी, नगरसेवक दीपक चौगुले यांनी सराफ बाजारात शोभायात्रेत सहभागी होवून महाराजांच्या पालखीचे व प्रतिमेचे पूजन केले. शोभायात्रेत बॅण्ड पथकाने फक्त धार्मिक गिते, संत शिरोमणी श्री रविदास महाराज यांचे दोहे व महापुरूषांच्या जीवनचरित्रावर आधारीत गीतेच म्हटली. कोणत्याही प्रकारचे अशोभनिय गीते व नृत्य कटाक्षाने टाळण्यात आली. बहुतांश बांधव पांढरा ड्रेस व टोपी घालून सहभागी झाले होते. मिरवणूक अतिशय शिस्तबद्ध निघाली. ठिकठिकाणी पुष्पवृष्टीही करण्यात आली.

दरम्यान, मिरवणुकीत सहभागी झालेल्या मोठ्या संख्येतील समाजबांधव व महिलांच्या लक्षणीय उपस्थितीने सर्वांचे लक्ष वेधले.

# (स्व.) अजितदादा पवारांसारखा लोकनेता होणे नाही..!

## अमळनेरला सर्वपक्षीय शोकसभेत श्रद्धांजली; अश्रूंचा फुटला बांध...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : (स्व.) उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी अमळनेर मतदारसंघासाठी भरभरून निधी दिला आहे. त्यांच्यामुळेच अमळनेरचा कायापालट झाला आहे. अजितदादा हे केवळ महाराष्ट्रासाठाचेच नव्हे, अमळनेरच्या जनतेचेही खऱ्या अर्थाने दादा होते. असा विकासपुरूष, लोकनेता होणे नाही, असा सूर येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी (स्व.) अजितदादा पवार यांच्या श्रद्धांजलीपर सर्वपक्षीय शोकसभेतून पदाधिकारी, कार्यकर्त्यांमधून उमटला. यावेळी सर्वच पक्षांचे नेते, कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, जेष्ठ नेत्या सौ. तिलोत्तमाताई पाटील, भाजयुमोच्या प्रदेशाध्यक्षा भैरवीताई पलांडे, डॉ. अविनाश जोशी, संजय पुनाजी पाटील, संदीप घोरपडे, डी. एम. पाटील, शिवाजी पाटील, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी, मनोज पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील, खा. शि. मंडळाचे चेअरमन सीए नीरज अग्रवाल, विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, माजी सभापती डॉ. दीपक पाटील, सरपंच संघटनेतर्फे महेंद्र बोरसे, ॲड. शकील काझी, ॲड. तिलोत्तमा पाटील, मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम, आम आदमी पार्टीतर्फे प्रा. गणेश पवार, नितीन भदाणे, इम्रान खाटिक, रिपाई तर्फे यशवंत बैसाणे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख नगरसेवक महेश देशमुख, अनिल शिसोदे, मुन्ना शर्मा, अमित पाटील, प्रा. योगिता कापडणे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त करून (स्व.) अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. संजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले. मराठा समाजाचे विक्रांत पाटील, भाजपचे शीतल देशमुख, उमेश वाल्हे, पत्रकार संघाचे चेतन राजपूत, जितेंद्र ठाकूर, राष्ट्रवादीचे भूषण भदाणे, शेतकी संघाचे संजय पाटील तसेच सर्व पक्षाच्या व समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी शोकसभेचे आयोजन केले होते. याप्रसंगी माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, बिपीन पाटील, ॲड. सौ. ललिताताई पाटील, सुलोचना वाघ, रिता बाविस्कर, माजी नगराध्यक्ष सुभाष चौधरी, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, सुषमा देसले, प्रा. अशोक पवार, मुक्तार खाटीक, राजेंद्र देशमुख, श्याम पाटील, गिरीश कुलकर्णी, हेमंत पवार, दाऊदी बोहरा समाज, न. पा. अधिकारी, कर्मचारी संघटना, जिल्हा बँक कर्मचारी, खा. शि. मंडळ, भाजप, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी, शिक्षक संघटना, व्यापारी, कामगार, काच माळी समाज, मराठा समाज, कुणबी



*अमळनेर : शोकसभेला उपस्थित आमदार अनिलदादा पाटील व सर्वपक्षीय मान्यवर आणि सामाजिक कार्यकर्ते.*

पाटील संघटना, ग्रामसेवक संघटना, पत्रकार संघटना, मराठा समाज महिला मंडळ, सावित्रीबाई महिला मंडळ, महिला मंच, रेशन दुकानदार संघटना, पोलीसपाटील, बाजार समिती आदी क्षेत्रातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आता आम्ही कोणाकडे बघायचे : आमदार अनिलदादा पाटील

सतत वेळ पाळणाऱ्या (स्व.) अजितदादांनी २८ जानेवारीला जीवनाची वेळ पाळली नाही. संपूर्ण महाराष्ट्राला वेदना देणारे कार्य नियतीने केले. आता आम्ही कोणाकडे बघायचे ? २०१६ मध्ये माझ्यावर कर्जाचा डोंगर झाला होता. मी भाजपचा असताना देखील त्यावेळी दादांनी माझ्या पाठीवर हात ठेवला नसता तर कदाचित मी आत्महत्या केली असती. अमळनेरच्या विकासासाठी अजितदादांचा सिंहाचा वाटा आहे. निम्न प्रकल्प पाडळसे धरणाला अजित दादांचे नाव दिले पाहिजे, अशा भावना अमळनेरच्या जनतेने व्यक्त केल्या आहेत. याबाबत मी विधानसभेत नक्कीच मागणी करणार आहे.

(पान ३ वर)

## संपादकीय

### नवे पर्व सुरू : सत्तेत सुनेत्राताई पवारांचा प्रवेश

**महाराष्ट्राच्या राजकारणात आता एक नवे पर्व सुरू झाले आहे. सुनेत्राताई पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आणि राज्याच्या सत्ताकारणात एक महत्त्वाची घडामोड नोंदवली गेली. ही शपथ केवळ एका व्यक्तीच्या सत्तारोहणापुरती मर्यादित नसून बदलत्या राजकीय वास्तवाचे, सामाजिक अपेक्षांचे आणि नेतृत्वाच्या नव्या परिभाषेचे प्रतीक ठरते. सुनेत्राताई पवार यांचे नाव आतापर्यंत सक्रिय राजकारणापेक्षा सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक कार्याशी अधिक जोडले गेले होते. त्यामुळे त्यांचा थेट सत्ताकेंद्रात प्रवेश हा अनेक अर्थांनी लक्षवेधी आहे. अनुभव, परिपक्वता आणि संयम या गुणांबरोबरच त्यांनी घेतलेली भूमिका ही सत्तेच्या पलीकडे पाहणारी असल्याचे त्यांच्या आतापर्यंतच्या वाटचालीत दिसून येते. त्यामुळेच त्यांच्या शपथविधीकडे केवळ राजकीय समीकरणांच्या चौकटीत पाहणे अपुरे ठरेल.**

**आज महाराष्ट्र अनेक आव्हानांच्या वळणावर उभा आहे. शेतकरी संकट, बेरोजगारी, महिलांचे प्रश्न, शिक्षण व आरोग्य व्यवस्थेची घडी, तसेच प्रशासनातील विश्वासार्हता या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री पदावर बसणाऱ्या व्यक्तीकडून केवळ राजकीय चातुर्य नव्हे, तर संवेदनशील निर्णयक्षमता अपेक्षित असते. सुनेत्राताई पवार यांच्याकडून हीच अपेक्षा जनतेला आहे. राजकारणातील महिलांच्या सहभागाबाबत नेहमीच चर्चा होते; मात्र सत्तेच्या सर्वोच्च पातळीवर निर्णयक्षम भूमिकेत महिला नेतृत्व येणे हे अजूनही अपवादात्मकच आहे. त्या अर्थाने सुनेत्राताई पवार यांचा हा शपथविधी केवळ व्यक्तीगत यश नसून, तो महिलांच्या राजकीय नेतृत्वाला मिळालेली नवी संधी मानावी लागेल. ही संधी केवळ प्रतिकात्मक न राहता परिणामकारक ठरेल, अशी आशा आहे.**

**अर्थात, सत्ता म्हणजे विश्वास आणि विश्वास म्हणजे सातत्यपूर्ण कामगिरी. पुढील काळात त्यांच्या निर्णयांमधून, प्राधान्यक्रमांमधून आणि प्रशासनावर उमटणाऱ्या त्यांच्या ठशातूनच या शपथेचे खरे मोल ठरणार आहे. राजकीय समीकरणे बदलतात; पण जनतेच्या अपेक्षा कायम राहतात. महाराष्ट्राला आज केवळ सत्तास्थैर्य नव्हे, तर दिशादर्शक नेतृत्वाची गरज आहे. सुनेत्राताई पवार यांच्या रूपाने सुरू झालेल्या या नव्या अध्यायाकडून राज्याच्या जनतेला अपेक्षा आहेत आणि त्या अपेक्षांना न्याय देणे हेच त्यांच्या शपथविधीचे खरे फलित ठरेल.**

## ढगाळ वातावरणाने रब्बीवर परिणाम

अमळनेर : गेल्या तीन ते चार दिवसांपासून शहरासह तालुक्यात ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. परिणामी थंडीचा जोरही कमी झाला आहे. उकाड्यात काही अंशी वाढ झाली. या वातावरणामुळे रब्बी पिकांवरही परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. पाऊस आल्यास कापणीवर आलेले पीक वाया जाईल की काय ? या विवंचनेत शेतकरी दिसून येत आहे.

# निर्मला सीतारमण; विकसीत भारताकडे वाटचाल

## केंद्रीय अर्थसंकल्प २०२६– २७

## काय स्वस्त, काय महाग? ए टू झेड माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी २०२६– २७चा देशाचा अर्थसंकल्प संसदेत सादर केला. आम्ही देशातील गरिबी निर्मूलनासाठी महत्वाचे काम केले. देश गेल्या १२ वर्षांपासून प्रगतीपथावर आहे. देशात गुंतवणुक वाढीला लागली आहे. भारताची विकसीत भारताकडे वाटचाल सुरू राहील. जीएसटी सोपे बनविणे आणि रोजगाराच्या संधी वाढवणे हे आमचे उद्दिष्ट आहे, असे अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सांगितले.

राष्ट्रीय हातमाग धोरण कारागिरांना प्रोत्साहन आणि समर्थन प्रदान करेल. शैक्षणिक संस्थांकडून तांत्रिक सहाय्य शक्य होईल. मेगा टेक्सटाइल पार्क स्थापन केले जातील. महात्मा गांधी ग्राम स्वराज, खादीला प्रोत्साहन देण्यासाठी उत्पादन, प्रशिक्षण आणि विपणनासाठी असेल. एक जिल्हा, एक उत्पादन याला प्रोत्साहन दिले जाईल. क्रीडा उपकरणे डिझाइन आणि उत्पादन करण्याची योजना आहे. औद्योगिक समूह पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान सुधारण्यासाठी एक योजना तयार करण्यात आली आहे. एमएसएमईसाठी सूक्ष्म उद्योगांना मदत करण्यासाठी स्वावलंबी भारत निधी तयार केला जाईल. सरकारी संस्थांना अल्पकालीन मॉड्यूलर अभ्यासक्रम डिझाइन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. टियर २ आणि ३ स्तरांपर्यंत प्रशिक्षण दिले जाईल. मालवाहतुकीसाठी मालवाहतूक कॉरिडॉर बांधले जातील. ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या टियर–२ आणि ३ शहरांच्या विकासासाठी ११. २ लाख कोटींचे वाटप करण्यात आले आहे. २०२५–२७ मध्ये ही रक्कम १२. २ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवली जाईल. खासगी विकासकांसाठी पायाभूत सुविधा जोखीम हमी निधी तयार करण्यात आला आहे. सरकार अंशतः हमी देईल. मालवाहतुकीसाठी एक समर्पित फ्रेट कॉरिडॉर बांधला जाईल. पूर्वेकडील दानकुनी ते पश्चिमेकडील सुरत या बंदराला जोडण्याची योजना देखील आहे. वाराणसी आणि पटना विकसित करून अंतर्गत जलमार्ग विकसित केले जातील. ७ हाय–स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील. देशातील सीप्लेन उत्पादकांना पाठिंबा दिला जाईल. मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद, हैदराबाद ते बेंगळुरू, हैदराबाद ते चेन्नई आणि सिलिगुडी ते वाराणसी यासह सात हाय–स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील. विकसित भारतासाठी एक उच्चस्तरीय बँकिंग समिती स्थापन केली जाईल.

**अर्थसंकल्पातून काय स्वस्त झाले?**

कॅन्सरची व मधुमेहाची औषधे, कपडे, चामड्याचे बूट, क्रीडा साहित्य, मोबाईल, ईव्ही बॅटरी, सौर पॅनेल, सीएनजी, वैद्यकीय उपकरणे, एलसीडी, एलईडी, भारतात बनविलेले कपडे, ईव्ही वाहने, मोटारसायकल, फ्रोझन मासे, ईव्ही लिथियम बॅटरी, वैद्यकीय उपकरणे, लिथियम आयन बॅटरी, अपघात विमा.

**अर्थसंकल्पातून काय महाग झाले?**

इंटरॅक्टिव्ह फ्लॅट, पॅनल डिस्प्ले, खनिज, पीव्हीसी फ्लेक्स शीट्स.

## केंद्रीय अर्थसंकल्पात महिलांच्या सशक्तीकरणाला विशेष प्राधान्य : खासदार स्मिताताई वाघ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी २०२६– २७ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या १२ वर्षांच्या स्थिर शासन, आर्थिक अनुशासन आणि सुधारित धोरणांच्या निरंतरतेला हे बजेट प्रतिबिंबित करते. वैश्विक अनेक आव्हान असूनही भारताने सुमारे ७ टक्के विकासदर कायम राखला आहे. हा अर्थसंकल्प ‘विकसित भारत’च्या मजबूत पायाभरणीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल. या अर्थसंकल्पात सामाजिक प्रभाव, समावेशक विकास आणि जनकल्याण यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. विशेषतः महिला सशक्तीकरणावर मोठा भर देण्यात आला आहे, अशी माहिती खासदार स्मिताताई वाघ यांनी दिली.

खासदार स्मिताताई वाघ यांनी सांगितले, की लक्ष्मीपती दीदी योजना, महिला उद्योजकता, बालिका शिक्षण, एसटीईएम क्षेत्रातील प्रोत्साहन आणि महिलानेतृत्वाखालील विविध योजना यांचा विस्तार केला जाणार आहे. या उपायांमुळे महिलांना राष्ट्रनिर्माणात सक्रिय आणि मजबूत भागीदार बनवण्याचे उद्दिष्ट आहे. युवा, शेतकरी, कामगार आणि एमएसएमई क्षेत्र हे या बजेटचे मुख्य केंद्रबिंदू आहेत. एआय आधारित कौशल्य विकास, नवीन रोजगार निर्मिती, कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार, ग्रामीण अर्थव्यवस्थेची मजबुती आणि उद्योग निर्माण क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक यावर विशेष जोर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील जळगावसहित विविध जिल्ह्यांच्या औद्योगिक, कृषी, लॉजिस्टिक्स, महिला स्वयंसहाय्यता गट (एसएचजी) आणि रोजगार क्षेत्रांना या अर्थसंकल्पातून नवीन गती आणि संधी मिळणार आहेत. हा अर्थसंकल्प विकासोन्मुख, जनकल्याणकारी, समावेशक आणि भविष्याभिमुख आहे. तो ‘सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास’ आणि ‘सबका मजबूत’ या भावनेला अधिक बळकटी देतो.

## गांधी रिसर्च फाऊंडेशनचा उपक्रम



*अमळनेर : श्री मंगळदेव ग्रह मंदिरात सायकल रॅलीचे स्वागत करताना मंगळ ग्रह सेवा संस्थेचे पदाधिकारी मनोहर तायडे, भरत पाटील, कैलास महाजन, शरद कुलकर्णी, आशिष चौधरी व सेवेकरी.*

# ग्रामसंवाद सायकल यात्रेची श्री मंगळग्रह मंदिरास भेट

## विविध राज्यातील ३५ जणांचा सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव येथील गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त जळगाव ते बारडोली भव्य ‘ग्राम संवाद सायकल यात्रा’ आयोजित करण्यात आली आहे. सत्य, अहिंसा, संवाद, सहअस्तित्व, सद्भाव, बंधुता, समानता आणि श्रमाची प्रतिष्ठा या गांधीजींच्या जीवनमूल्यांचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने ही यात्रा दरवर्षी आयोजित केली जाते. यावर्षीही ही यात्रा जळगाव, धुळे, नंदुरबार तसेच तापी व सुरत जिल्ह्यातील सुमारे ८० गावांशी संवाद साधणार आहे. या सायकल यात्रेने रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी येथील श्री मंगळग्रह मंदिरास भेट दिली.

या यात्रेस ३० शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी जळगाव येथील गांधी तीर्थ येथून प्रारंभ झाला. ही यात्रा विद्यापीठ, धरणगाव, भोणे, अमळनेर, भरवस, बेटावद, शिंदखेडा, धामाने, दोंडाईचा भालेर, नंदुरबार, धानोरा, पाटीबंधारा, नारायणपूर, उच्छल भडभुंजा सोनगड, खांबला, व्यारा, वेडच्छी अल्लूबोरिया, मालिबा आदी ठिकाणांमधून मार्गक्रमण करत बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी बारडोली येथे पाहोचून समारोप होणार आहे. यात्रेदरम्यान विविध सामाजिक व जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येत आहेत. यात पथनाट्य, महिलांचा सन्मान, पर्यावरण संरक्षण, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण आणि अहिंसेचा स्वीकार याबाबत जनजागृती केली जात आहे. यात्रेत समन्वयक गिरीश कुलकर्णी, डॉ. अश्विन झाला, अब्दुल भाई, प्रशांत सूर्यवंशी, विश्वजीत पाटील आदींसह विद्यार्थी व विद्यार्थिनींची मोठी उपस्थिती होती.

पान १ वरून...

# अमळनेरला सर्वपक्षीय शोकसभेत अश्रूंचा फुटला बांध...!!

**धरणाला अजितदादांचे नाव द्यावे :**
**माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील**

पाडळसरे धरणाच्या बंद पडलेल्या कामाला अजितदादांनीच गती दिली आहे. त्यांनी धरणासाठी भरघोस निधी दिल्यामुळेच धरणात पाणी अडविता आले. त्यामुळेच आज धरणात पाणीसाठा आपल्या दिसतो आहे. त्यामुळे धरणाला अजितदादांचे नाव द्यावे. तसेच शेतकरी कर्जमुक्ती योजनेसही अजितदादांचे नाव देण्यात यावे. अजितदादा शेतकऱ्यांचे कैवारी होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यांची भूमिका ठाम असायची.

**असा जननायक होणे नाही :**
**नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर**

नगराध्यक्षपदी विजयी झाल्यानंतर मी आताच राजकारणात सक्रीय झालो आहे. मात्र, मी (स्व.) अजितदादांची विकासकामे पाहिली आहेत. त्यांनी अमळनेरला भरभरून दिले आहे. त्यांच्यामुळेच अमळनेर प्रगतीपथावर आहे. अजितदादांसारखा लोकनेते, बहुजन नेते, सहकार नेते तयार व्हायला कमीत कमी पन्नास वर्षे तरी लागतात. मात्र, असा जननायक आता होणे नाही. दादांमुळेच महाराष्ट्राचे राजकारण स्थिर राहिले आहे.

**नाट्यगृहासाठी अजितदादांचे सहकार्य :**
**संदीप घोरपडे**

(स्व.) अजितदादांचे अकाली निधन मनाला चटका लावून गेले आहे. राजेश टोपे नगरविकास राज्यमंत्री असताना या नाट्यगृहासाठी पहिला ३१ लाखांचा धनादेश अजितदादांनी हट्टाने दिला होता. विकासकामांबाबत माझी अनेकदा अजितदादांशी भेट झाली होती. अजितदादा हे अत्यंत स्पष्ट वक्ता होते. त्यांच्या कामाची शैली अत्यंत विलक्षण व आगळीवेगळी होती. प्रत्येकाची ते आस्थेवाईकपणे चौकशी करून समजून घेत होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

**असे नेतृत्व पुन्हा होणे नाही :**
**माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील**

(स्व.) अजितदादा हे सत्तेत असो वा नसो. मात्र, त्यांची काम करण्याची हातोटी, कार्यकर्त्यांवरील आपुलकी आणि सर्वसामान्यांवरील प्रेम असे ते एकमेव नेतृत्व होते. असे नेतृत्व पुन्हा निर्माण होणे कठीण आहे. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शब्दच नाहीत. अजितदादांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. असा लोकनेता पुन्हा होणे नाही.

**अजितदादा खऱ्या अर्थाने ‘दादा’ होते :**
**डॉ. अविनाश जोशी, अध्यक्ष, मराठी वाङ्मय मंडळ.**

अमळनेर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अजितदादांचे अनमोल सहकार्य लाभले होते. अमळनेर तालुक्याच्या विकासाची कामे त्यांच्यामुळेच प्रगतीपथावर गेली आहेत. कोणीही असो त्याला सढळ हाताना मदत करणे हा त्यांचा स्वभाव होता. खऱ्या अर्थाने ते महाराष्ट्रातील जनतेचे ‘दादा’ होते. त्यांच्या निधनाने मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

## मन शांत ठेवण्यासाठी ‘या’ सोप्या ५ टिप्स

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुष्यातील तणावाच्या प्रसंगी शांत राहण्याच्या सोप्या टिप्स. जेव्हा तुम्ही दीर्घ श्वास घेता आणि हळूहळू सोडता, तेव्हा तुमच्या शरीराला त्वरित आराम मिळतो. ही क्रिया मेंदूला शांततेचा संदेश देते. साचलेला तणाव काही क्षणात कमी करण्यास मदत करते. मनातील चिंतांपासून लक्ष वळविण्यासाठी एखाद्या अतिशय शांत आणि निसर्गरम्य ठिकाणाची (उदा. झाडी, डोंगर किंवा समुद्रकिनारा) कल्पना करा. ही मानसिक सफर तुम्हाला तणावापासून दूर नेऊन प्रसन्नता देईल. कोणत्याही गोष्टीवर तातडीने प्रतिक्रिया देण्याऐवजी काही सेकंद थांबा. हा छोटासा विराम तुमचे विखुरलेले विचार पुन्हा व्यवस्थित करण्यास आणि शांत डोक्याने निर्णय घेण्यास मदत करतो. अस्वस्थ वाटत असल्यास थोडे स्ट्रेचिंग करा किंवा थोडा वेळ चाला. शरीराच्या या हलक्या हालचालींमुळे तणाव कमी होतो, रक्ताभिसरण सुधारते आणि मनाला पुन्हा उभारी मिळते. दिवसभरातील चांगल्या गोष्टींची आठवण करा आणि त्याबद्दल कृतज्ञ राहा. जेव्हा आपण आयुष्यातील सकारात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित करतो, तेव्हा चिंतेची जागा आपोआप सकारात्म जाते.

# हजरजबाबी, दिलखुलास अंदाज आणि मिश्कील दादा...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



स्व. अजितदादा पवार हे जितक्या कडक शिस्तीचे नेते होते, तितकेच ते मिश्कील आणि दिलखुलास होते. जाहीर सभांमध्ये किंवा वैयक्तिक भेटीत ते अनेकदा मनमोकळे बोलत. कठोर शब्दांत बोलून मग सांभाळूनही घेत. त्यांचा हा अंदाज राजकीय वर्तुळात आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्येही चर्चेचा विषय ठरत असे.

शरद पवारांची साथ सोडून भाजपसोबत गेल्यानंतर ते सरकारमध्ये सहभागी झाले. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांचा हा मिश्कील अंदाज पाहायला मिळाला. पत्रकारांनी एकनाथ शिंदे यांना शपथ कधी घेणार, असा प्रश्न विचारला. शिंदे उत्तर देण्यास टाळाटाळ करत होते. सायंकाळपर्यंत थांबा म्हणत होते. तेवढ्यात त्यांना मध्येच तोडत अजितदादा पवार म्हणाले, की ‘त्यांचे सायंकाळी ठरेल, पण मी तर उद्याच शपथ घेणार आहे.’ त्यांच्या या वक्तव्यावर सगळेच हास्यकल्लोळात बुडून गेले. पुण्यातील एका कार्यक्रमात रोहित पवारांनी अजितदादांना भावकीकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला होता. त्यावर अजितदादा पवारांनी जोरदार फटकेबाजी केली होती.

‘भावकीकडे लक्ष दिले म्हणूनच तू आमदार झालास. जयंतराव, त्याला विचारा, किती मते पडलीत? पोस्टल बॅलेटवर निवडून आलाय आपण. लोकसभा निवडणुकीत बीडमध्ये केलेल्या भाषणात अजितदादा पवारांनी बजरंग सोनवणे यांना जोरदार टोले हाणले. ‘मला येऊन सांगायचा, छाती फाडली की तुम्ही दिसाल. ही दिसेल, ती दिसेल. अरे छाती फाडल्यावर मरून जाशील, कशाला उगा गप्पा हाणायच्या? हनुमानजींनी फाडलेली छाती वेगळी. तू पुठे बजरंगा, तू स्वतःला हनुमानजी समजायला लागला का?

लोकसभा निवडणुकीत पक्षाच्या झालेल्या पराभवानंतर विधानसभा प्रचारासाठी अजितदादांनी बारामतीत सभा घेतली. त्यावेळी लोकांना प्रेमळ शब्दांत दमबाजी केली. ‘लोकसभेसारखा दणका मला देऊ नका. लय वंगाळ वाटते एवढे काम करून. बेंबीच्या देठापास्नं सांगतोय, घाम येतोय. पटवून देतोय. समोरच्यांनी काय दिले, देवळात वाजवायची घंटा दिली का? मला काय कळतच नाय. आवाजात प्रेमळपणा असलेले देखणे नेतृत्व अशा शब्दांत एका कार्यक्रमात सूत्रसंचालकाने जयंत पाटील यांचे कौतुक केले. त्यावर अजितदादा पवार यांनी जोरदार टोलेबाजी केली. ‘आम्ही काय देखणे न्हाय काय. वाळव्याला बोलवायचे. इथे बोलवायचे आणि बिनपाण्याने करायची. जयंत पाटील देखणे आणि मी काय बिनदेखणा हाय का? तू भेट मला, बघतोच तुला.

**सूत्रांना एखादा जीवनगौरव पुरस्कार देऊन टाका...**

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र राज्याच्या तिजोरीवर ताण पडतो म्हणून कर्जमाफी देऊ शकत नाही, अशी भूमिका अर्थमंत्री अजित पवार यांनी घेतल्याची बातमी समोर आली होती. यावर आपली भूमिका स्पष्ट करताना ‘हे सूत्र मला एकदा पाहायचेच आहेत, मी म्हणतो सूत्रांना एखादा जीवन गौरव पुरस्कार देऊनच टाका. हे सूत्र माझ्या हातात सापडू द्या, त्याचा पुरेपूर बंदोबस्त करतो. कर्जमाफी देऊ नका असं मी कधीच म्हणणार नाही. संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे, मला जे बोलायचं ते मी बोलतोच. त्यासाठी सूत्र कशाला पाहिजे,’ असा संताप अजितदादांनी व्यक्त केला होता.

**घरी जाऊन बायकोला लव यू म्हण...**

पिंपरी–चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्र. २ मध्ये दादांच्या भाषणावेळी मजेशीर किस्सा घडला. भाषणावेळी एक कार्यकर्ता अचानकच दादांना ‘लव यू दादा’ असे मोठ्याने म्हणाला. याला तत्काळ उत्तर देत ते म्हणाले, ‘घड्याळाचे बटण दाब, ते लव्ह यू राहू दे बाजूला... घरी जाऊन बायकोला म्हण आय लव्ह यू... बायको म्हणेल गडी आज लयच बिघडलाय..!’ अशी टोलेबाजी केली. दादांचा हा हजरजबाबीपणा पाहून कार्यकर्तेही चांगलेच हसू लागले.

**माझे टक्कल पडलेय, तरी हे लोक मलाच शिकवतात**

राजगुरूनगरमध्ये सभा सुरू असताना बाबा राक्षे हे अजितदादा पवार यांच्याजवळ व्यासपीठावर गेले आणि त्यांना काहीतरी सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अजितदादा पवार मिश्कीलपणे म्हणाले, की ‘होय होय बाबा होय. आता हा मला शिकवायला चाललाय, आता असे बोला, आता तसे बोला. माझे पार टक्कल पडले तरी लोक मला शिकवतायेत. आता काय करू या बाबाला. बाबा लोक अशीच असतात. सगळे बाबा लोकांचे ऐकावे लागते. आता पुठल्या बाबा लोकांचे ऐकावे लागते, याचा विचार तुम्ही करा,’ असे अजितदादा मिश्कीलपणे म्हणताच उपस्थितांमध्ये हशा पिकला.

**नंतर भेट... सांगतो**

बारामती येथे सर्वांत उंच ध्वजस्तंभाच्या लोकार्पण सोहळ्यादरम्यान अजितदादा पवार यांनी भाषण केले. यावेळी एका कार्यकर्त्याने पाठीमागून टिप्पणी केली, ‘दादा, पुन्हा सांगा, ऐकायला आले नाही.’ यावर अजितदादांनी आपल्या नेहमीच्या बेधडक अंदाजात प्रत्युत्तर दिले, ‘नंतर भेट, सांगतो. तुला ऐकायला आले नसेल तर दिलगिरी व्यक्त करतो!’ या उत्तराने उपस्थितांमध्ये हशा पिकला आणि दादांच्या खुमासदार शैलीचे कौतुक झाले.

**बिबटे नव्हे, आधी गावकरीच शेळया खातील...**

राज्यात बिबट्यांचा हैदोस सुरू असताना वनमंत्री गणेश नाईकांनी त्यावर एक कोटी रुपयांच्या शेळ्या जंगलात सोडण्याचा पर्याय सुचवला. त्यावर जंगलात शेळ्या सोडल्यास बिबटे खाण्याऐवजी आधी गावकरीच त्या बकऱ्यांवर ताव मारतील, असा मिश्कील टोला अजितदादांनी वनमंत्र्यांना लगावला होता.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# दहावीपर्यंत शिक्षण, स्टेशनवर रात्र काढली, विस्फोटकांच्या क्षेत्रात एंट्री

**सक्सेस स्टोरी**

## कोटींचे मालक असलेले उद्योगपती सत्यनारायण नुवाल यांना पद्मश्री

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सत्यनारायण नुवालची कहाणी प्रेरणादायी आहे. त्यांनी दहावीपर्यंत शिक्षण घेतले. १९ व्या वर्षी लग्न केले आणि कुटुंबाची जबाबदारी स्वीकारली. त्यांनी उदरनिर्वाहासाठी घर सोडले, रेल्वे स्टेशनवर रात्र घालवली. आज त्यांच्याकडे ५० हजार कोटी रुपयांची मालमत्ता आहे. त्यांचे व्यवसाय ९० देशांमध्ये पसरलेले आहेत. त्यांनी कठोर परिश्रम आणि योग्य निर्णयांमुळे हे स्थान मिळविले.

राजस्थानमधील एका छोट्या गावात जन्मलेले सत्यनारायण नुवाल आता ७३ वर्षांचे आहेत. त्यांच्याकडे ५० हजार कोटी रुपयांची मालमत्ता आहे. त्यांचा व्यवसाय केवळ भारतापुरता मर्यादित नाही, तर जगभरातील ९० देशांमध्ये पसरलेला आहे. आज त्यांना देशातील सर्वांत श्रीमंत आणि यशस्वी उद्योगपतींपैकी एक मानले जाते.

### सत्यनारायण यांचा संघर्षमय प्रवास


सत्यनारायण यांचे मर्यादित शिक्षण, लहान वयात लग्न आणि आर्थिक अडचणी असूनही, त्यांनी कधीही हार मानली नाही. कठोर परिश्रम, संयम आणि योग्य निर्णयांमुळे ते श्रीमंतीकडे गेला. फोर्ब्सच्या रिअल-टाइम बिलियनेअर्स इंडेक्सनुसार ७३ वर्षीय सत्यनारायण नुवाल यांचे नाव भारतातील सर्वांत श्रीमंत व्यक्तींमध्ये येते. ते ८४६ व्या क्रमांकावर आहेत.

### सोलर इंटस्ट्रीजीतील प्रमुख कंपनी

सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेडचे संस्थापक आणि अध्यक्ष नुवाल यांची एकूण संपत्ती ५.६ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. त्यांच्या कंपनीचे बाजार भांडवल अंदाजे एक कोटी १३ लाख रुपये आहे आणि सोलर इंडस्ट्रीज संरक्षण क्षेत्रातील एक प्रमुख कंपनी बनली आहे. परंतु या पदापर्यंतचा प्रवास सोपा नव्हता. राजस्थानातील भिलवाडा येथील एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या सत्यनारायण नुवाल यांनी दहावीनंतर शिक्षण सोडले.

### फक्त दहावी शिक्षण

आर्थिक परिस्थितीमुळे पुढील शिक्षण अशक्य झाले. दरम्यान, वयाच्या १९ व्या वर्षी त्यांचे लग्न झाले आणि जबाबदाऱ्यांचा भार वाढला. यामुळे त्यांना घर सोडावे लागले आणि कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी काम शोधावे लागले. संघर्षाचे ते दिवस अत्यंत कठीण होते. नुवाल यांनी स्वतः फोर्ब्सला दिलेल्या जुन्या मुलाखतीत सांगितले, की कामाच्या शोधात असताना त्यांच्याकडे जगण्यासाठी पुरेसे पैसेही नव्हते आणि त्यांना अनेकदा रेल्वेस्थानकांवर रात्री काढाव्या लागत होत्या.



### लहान-मोठे व्यवसाय केले

त्यांनी फाउंटन पेन इंक आणि भाडेपट्टा व्यवसायांपासून ते वाहतुकीच्या कामापर्यंत, लहान आणि मोठ्या अशा विविध व्यवसायांमध्ये हात आजमावला. परंतु सुरूवातीला त्यांना यश मिळाले नाही. तरीही त्यांनी हार मानली नाही आणि त्यांचा आत्मविश्वास कायम ठेवला, असे ते म्हणाले.१९७६-७७ च्या सुमारास ते महाराष्ट्रातील चंद्रपूर येथे गेले. जेथे त्यांनी एका नातेवाईकासोबत काम करायला सुरूवात केली. तेथेच त्यांची भेट अब्दुल सत्तार अल्लाह भाई यांच्याशी झाली. ज्यांच्याकडे स्फोटकांचा परवाना होता आणि ते गनपावडर डेपोचा मालक होता.

### टर्निंग पॉइंट कुठे ठरला?

जेव्हा भाडे देणे देखील कठीण वाटत होते, तेव्हा अब्दुल सत्तारने त्याला विश्वास दिला आणि म्हटले, की 'मला दर तीन महिन्यांनी एकदा पैसे द्या.' हे आश्वासन नंतर त्याच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा ठरले. हळूहळू, कोळसा खाणींमधून ऑर्डर येऊ लागल्या आणि व्यवसायाने वेग घेतला. १९८४ पर्यंत ते एक कन्साइनमेंट एजंट बनले आणि १९९० च्या दशकापर्यंत त्यांनी स्वतःला स्फोटकांचा एक प्रमुख डीलर म्हणून स्थापित केले. हे दशक त्याच्यासाठी टर्निंग पॉइंट ठरले. १९९५ मध्ये त्यांनी ६० लाख रुपये बँक कर्ज घेतले आणि स्वतःची कंपनी सुरू केली.

### आज हजारो कोटींचे मालक

परवाना मिळाल्यानंतर व्यवसाय झपाट्याने वाढला. २००६ मध्ये ही कंपनी स्टॉक एक्स्चेंजमध्ये सूचीबद्ध झाली. ज्याची उलाढाल अंदाजे ७८ कोटी रुपये होती. २०१० पर्यंत सोलर इंडस्ट्रीज ही भारताच्या संरक्षण दलांसाठी स्फोटके तयार करण्यासाठी सरकारी परवाना मिळविणारी पहिली खासगी कंपनी बनली. स्टेशनवर रात्र घालवली. आता हजारो कोटी रुपयांच्या कंपनीचे मालक आहे आणि ही कहाणी त्यांना खास बनवते.

# जगात सर्वाधिक कर्ज कोणत्या देशावर?

**यादीमध्ये भारत कितव्या स्थानी?**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या घडीला अनेक देशांवर कोट्यवधी डॉलर्सचे कर्ज आहे. भारतावरही बरेच कर्ज आहे. कर्ज असणाऱ्या या देशांच्या यादीत भारत कितव्या स्थानावर आहे, हे जाणून घेऊया.

जानेवारी २०२६ च्या डेटानुसार तसेच आर्थिक सर्वेक्षण २०२५-२६ नुसार अनेक मोठ्या अर्थव्यवस्था आजघडीला कर्जाच्या ओझ्याखाली दबल्या आहेत. युद्धामुळे, वाढत्या जनसंख्येमुळे, योजनांवरील खर्चामुळे अनेक देशांची अर्थव्यस्था राजकोषीय तुटीत आहेत. अशा स्थितीत कोणत्या देशावर किती कर्ज आहे, असे विचारले जात आहे.

भारत यात कोणत्या स्थानावर आहे, याबाबतही विचारणा होत आहे. अमेरिका या देशावर इतर देशांच्या तुलनेत सर्वाधिक कर्ज आहे. या देशावर साधारण ३८.३ ट्रिलियन डॉलर्स भारतीय चलनात अंदाजे ३१८० लाख कोटी ते ३२०० लाख कोटी रुपये कर्ज आहे. सैन्यावरचा खर्च, कल्याणकारी योजना यावर होणाऱ्या अतिरिक्त खर्चामुळे या देशाला कर्ज घेण्याची वेळ वारंवार येते.



कर्जाच्या बाबतीत चीन दुसऱ्या स्थानावर आहे. चीनवर एकूण १८.७ ट्रिलियन डॉलरचे म्हणजे भारतीय चलनात १६८३ ते १७२० लाख कोटी रुपये कर्ज आहे. पायाभूत सुविधांवरील खर्च आणि आर्थिक प्रोत्साहनपर योजनांमुळे चीनवर एवढे कर्ज घेण्याची वेळ आलेली आहे. कर्जाच्या बाबतीत जपान हा देश तिसऱ्या स्थानावर आहे. या देशावर एकूण ९.८ ट्रिलियन डॉलर भारतीय चलनात ८ कोटी १२ लाख ते ८ कोटी २३ लाख रुपये सरकारी कर्ज आहे. ब्रिटन म्हणजेच युनायटेड किंग्डम हा देश कर्जाच्या बाबतीत चौथ्या स्थानावर आहे. या देशावर एकूण ४.१ ट्रिलियन डॉलर भारतीय चलनात ३७४ लाख कोटी ते ३७७ लाख कोटी रुपये सरकारी कर्ज आहे. तर फ्रान्स या देशावर ३.९ ट्रिलियन डॉलर भारतीय चलनात ३ लाख ५७ हजार ६३० कोटी रुपये सरकारी कर्ज असून हा देश पाचव्या स्थानावर आहे. कर्जबाजारी देशांच्या यादीत इटली हा देश सातव्या स्थानी असून या देशावर ३.५ ट्रिलियन डॉलर भारतीय चलनात अंदाजे २ लाख ९० हजार ५०० कोटी रुपये कर्ज आहे. कर्जाच्या बाबतीत भारत सहाव्या स्थानावर आहे. भारतावर ३.८ ट्रिलियन डॉलरचे म्हणजेच ३५० लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे.

# किस कॉलेज से पढ़े हैं आयपीएस रहे अजीत डोभाल

## जानें यूपीएससी में कितनी थी उनकी रैंक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अजीत डोभाल का जन्म २० जनवरी १९४५ को उत्तराखंड के पौड़ी गढ़वाल के घिरी बनल्स्यूं गांव में एक गढ़वाली परिवार में हुआ था। वह भारत के सबसे कम उम्र के पुलिस अधिकारी थे, जिन्हें कीर्ति चक्र से सम्मानित किया गया। कीर्ति चक्र सैन्य कर्मियों के लिए एक वीरता पुरस्कार है। उनके पिता, मेजर जी. एन. डोभाल, भारतीय सेना में ऑफिसर थे।

अजीत डोभाल के बारे में पाकिस्तान में सीमा पार भारत की सितंबर २०१६ की सर्जिकल स्ट्राइक और फरवरी २०१९ की बालाकोट एयरस्ट्राइक अजीत डोभाल की देखरेख में की गई थी। उन्होंने डोकलाम गतिरोध को खत्म करने में भी मदद की और पूर्वोत्तर में उग्रवाद से निपटने के लिए निर्णायक कदम उठाए। डोभाल ने १९८४ में खालिस्तानी उग्रवाद को खत्म करने के लिए 'ऑपरेशन ब्लू स्टार' के लिए खुफिया जानकारी इकट्ठा करने में भी महत्वपूर्ण भूमिका निभाई थी। डोभाल १९९० में कश्मीर गए और कट्टर आतंकवादियों और सैनिकों को आतंकवाद विरोधी बनने के लिए राजी किया, जिससे १९९६ में जम्मू-कश्मीर चुनावों का रास्ता साफ हुआ।

### अजीत डोभाल यूपीएससी रैंक

अजीत डोभाल ने १९६८ में एक आयपीएस अधिकारी के रूप में अपना पुलिस करियर शुरू किया और मिजोरम और पंजाब में आतंकवाद विरोधी अभियानों में सक्रिय रूप से शामिल थे। उन्होंने १९९९ में कंधार में अपहृत आयसी-८१४ के यात्रियों को छुड़ाने के लिए तीन वार्ताकारों में से एक के रूप में महत्वपूर्ण भूमिका निभाई। उन्होंने १९७१ और १९९९ के बीच इंडियन एयरलाइंस के कम से कम १५ विमानों के अपहरण को सफलतापूर्वक समाप्त किया। अजीत डोभाल पाकिस्तान कहा जाता है कि अजीत डोभाल ने पाकिस्तान में एक अंडरकवर एजेंट के रूप में सात साल बिताए, जहां उन्होंने सक्रिय आतंकवादी समूहों के बारे में खुफिया जानकारी इकट्ठा की। एक साल तक गुप्त एजेंट के रूप में काम करने के बाद, उन्होंने छह साल तक इस्लामाबाद में भारतीय उच्चायोग में काम किया।

अजीत डोभाल एजुकेशन अजीत डोभाल ने अपनी स्कूलिंग राजस्थान के अजमेर में किंग जॉर्ज रॉयल इंडियन मिलिट्री स्कूल (अब अजमेर मिलिट्री स्कूल) से की। १९६७ में उन्होंने आगरा यूनिवर्सिटी से इकोनॉमिक्स में मास्टर डिग्री हासिल की। दिसंबर २०१७ में डोभाल को आगरा यूनिवर्सिटी से साइंस में मानद डॉक्टरेट की उपाधि मिली। मई २०१८ में उन्हें कुमाऊं यूनिवर्सिटी से लिटरेचर में मानद डॉक्टरेट की उपाधि मिली। नवंबर २०१८ में उन्हें एमिटी यूनिवर्सिटी से फिलॉसफी में मानद डॉक्टरेट की उपाधि मिली।



### 'इंडियन जेम्स बॉन्ड' का टाइटल, भारत का जेम्स बॉन्ड

१९६८ में अजीत डोभाल इंडियन पुलिस सर्विस में शामिल हुए और पंजाब और मिजोरम में आतंकवाद विरोधी ऑपरेशन्स में एक्टिव रूप से शामिल थे। उन्हें 'इंडियन जेम्स बॉन्ड' का टाइटल दिया गया था।

# प्रायव्हेट जेटचे भाडे किती?

## एका ट्रिपसाठी किती खर्च येतो? सरकारचे नियम काय सांगतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या प्रत्येकाचे काही ना काही एक स्वप्न नक्कीच असते, कोणाचे अलिशान बंगला बांधण्याचे, तर कोणाची महागडी कार घेण्याचे. पण जेव्हा आपण 'अफाट श्रीमंती' असा शब्द वापरतो, तेव्हा डोळ्यासमोर येते ते म्हणजे निळ्या आकाशात झेपावणारे एक पांढरे-शुभ्र 'प्रायव्हेट जेट'. सिनेमांमध्ये जेव्हा एखादा बिझनेस टायकून किंवा सुपरस्टार स्वतःच्या विमानातून दिमाखात उतरतो, तेव्हा ते दृश्य पाहून अनेकदा असं वाटतं की वाह भाई एन्ट्री असावी तर अशी आणि आपण पण कधी-कधी अशी एन्ट्री करावी.

प्रायव्हेट जेट म्हणजे केवळ प्रवासाचे साधन नाही, तर ते यश आणि लक्झरीचे सर्वोच्च शिखर मानले जाते. पण तुम्हाला माहिती आहे का? हे विमान विकत घेणे जितके आव्हानात्मक आहे, त्यापेक्षा कितीतरी जास्त कठीण आहे ते टिकवून ठेवणे. आज आपण या 'उडत्या महाला'च्या किंमतीपासून ते त्याच्या खरेदीच्या नियमांपर्यंतची सर्व माहिती अगदी सोप्या भाषेत जाणून घेणार आहोत.

### आकाशातील लक्झरी

प्रायव्हेट जेटची किंमत, देखभाल आणि ते विकत घेण्याचे नियम1. एका प्रायव्हेट जेटची किंमत नक्की किती असते? विमानाची किंमत ही त्याच्या इंजिनची क्षमता, आतील सजावट आणि ते किती लांबचा प्रवास करू शकते यावर ठरते.



### लाईट जेट्स

यामध्ये ४ ते ६ लोक बसू शकतात. याची किंमत साधारण १५ कोटी ते ४० कोटी रुपयांपर्यंत असते. ही विमाने कमी अंतराच्या प्रवासासाठी उत्तम असतात.

### १) एका प्रायव्हेट जेटची किंमत नक्की किती असते?

विमानाची किंमत ही त्याच्या इंजिनची क्षमता, आतील सजावट आणि ते किती लांबचा प्रवास करू शकते यावर ठरते.

### लाईट जेट्स

यामध्ये ४ ते ६ लोक बसू शकतात. याची किंमत साधारण १५ कोटी ते ४० कोटी रुपयांपर्यंत असते. ही विमाने कमी अंतराच्या प्रवासासाठी उत्तम असतात.

### मिड-साईज जेट्स

यामध्ये ८ ते १० लोक बसू शकतात आणि सोयी-सुविधाही जास्त असतात. याची किंमत ६० कोटी ते १५० कोटी रुपयांच्या दरम्यान असते.

### लार्ज/हेवी जेट्स

हे म्हणजे चालते-फिरते महालच असतात. यामध्ये बेडरूम, मीटिंग रूम आणि किचन असते. यांची किंमत ३०० कोटींपासून ते ८०० कोटी रुपयांपर्यंत किंवा त्यापेक्षाही जास्त असू शकते.

### २) खरेदी कोण करू शकते? आणि काय आहेत नियम?

प्रायव्हेट जेट खरेदी करण्यासाठी केवळ पैसा असून चालत नाही, तर भारताच्या नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच कडक नियम पाळावे लागतात.

### सुरक्षा क्लिअरन्स

विमान घेणाऱ्या व्यक्तीला किंवा कंपनीला गृह मंत्रालयाकडून 'सिक्युरिटी क्लिअरन्स' मिळवणे अनिवार्य आहे. विमान खरेदी करताना मोठ्या प्रमाणावर परकीय चलन वापरले जाते, त्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे पालन करावे लागते. जर तुम्ही स्वतःसाठी विमान घेत असाल तर तुम्हाला 'नॉन-शेड्युल्ड ऑपरेटर' म्हणून नोंदणी करावी लागते.

### पात्रता

कोणतीही भारतीय नागरिकत्व असलेली व्यक्ती किंवा भारतात नोंदणीकृत कंपनी हे विमान खरेदी करू शकते.

### ३) एका वेळेच्या प्रवासासाठी नक्की किती खर्च येतो?

विमान हवेत असो वा जमिनीवर, त्याचा खर्च कधीच थांबत नाही. तुम्ही एकदा प्रवास करायचा ठरवला तर खालील खर्च डोळ्यासमोर ठेवावे लागतात.

### इंधन

विमानाचे इंधन अत्यंत महाग असते. एका लहान विमानाच्या एका तासाच्या प्रवासासाठी साधारण ५० हजार ते एक लाखाचे इंधन लागते.

### लॅंडिंग आणि पार्किंग फी

कोणत्याही विमानतळावर विमान उतरवण्यासाठी 'लॅंडिंग चार्जेस' द्यावे लागतात. जर विमान तिथे रात्री पार्क केले, तर त्याचे 'पार्किंग चार्जेस' वेगळे असतात.

### ग्राउंड हॅंडलिंग

विमानाची साफसफाई आणि प्रवाशांची सोय पाहणाऱ्या टीमला ५० हजार ते एक लाख रुपये द्यावे लागतात. जर तुम्ही भाड्याने विमान घेतले, तर एका तासाला १.५ लाख ते ८ लाख रुपये मोजावे लागतात.

### ४) खिशाला कात्री लावणारा 'मेंटेनन्स' खर्च

प्रायव्हेट जेट घेणे सोपे आहे, पण ते सांभाळणे कठीण आहे, असे का? असा प्रश्न तुम्हाला ही पडला असेल तर खालील मुद्यांवरुन तुम्हाला हे लक्षात येईल.

एका जेटसाठी किमान दोन अनुभवी पायलट आणि केबिन क्रू लागतो. त्यांचा पगार, प्रशिक्षण आणि हॉटेल स्टेचा खर्च वार्षिक करोडोंमध्ये जातो.

### विमा

विमानाचा विमा उतरवणे अत्यंत महागडे असते. विमानाची किंमत जितकी जास्त, तितका विम्याचा हप्ता मोठा.

### हॅंगर भाडे

विमान उभे करण्यासाठी विमानतळावर खास जागा भाड्याने घ्यावी लागते. याचे महिन्याचे भाडे लाखो रुपये असते.

### ५)विमान खरेदी कुठून करायची?

विमान घेण्यासाठी कारसारखे शोरूम्स नसतात. यासाठी एअरक्राफ्ट ब्रोकर किंवा एव्हिएशन मॅनेजमेंट कंपन्यांची मदत घेतली जाते. 'गल्फस्ट्रीम', 'बॉम्बार्डियर' आणि 'दसॉल्ट' यांसारख्या मोठ्या कंपन्या थेट कंपन्यांशी संपर्क साधून किंवा एजंटमार्फत नवीन विमाने विकतात. सेकंड हॅंड विमानांसाठी 'कंट्रोलर'सारख्या जागतिक वेबसाईटचा वापर केला जातो. प्रायव्हेट जेट असणे ही खूप मोठी जबाबदारी आहे. मात्र, वेळेची बचत आणि गोपनीयतेसाठी मोठे उद्योगपती आणि सेलिब्रेटी हा खर्च आनंदाने सोसतात. तुम्हाला जर विमानाने प्रवास करायचा असेल तर स्वतःचे विमान घेण्यापेक्षा आजकाल 'चार्टर' करणे हा अधिक स्वस्त पर्याय मानला जातो. यासाठी तासाला १.५ लाख ते ८ लाख रुपये मोजावे लागतात.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# शिव सहस्त्रनाम स्तोत्रम् – अर्थासह मराठी भावार्थानुसार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**(१०१) छत्रं सुच्छत्रो विख्यातो लोकः सर्वाश्रयः क्रमः।**
**मुण्डो विरूपो विकृतो दण्डी कुण्डी विकुर्वणः॥**

**अर्थ :** छत्र-आश्रय देणारा, सुच्छत्र-सर्वांचा रक्षक, लोक-सर्व विश्वाचा आधार, मुण्ड-भस्मविभूषित, विरूप-रूपातीत, दण्डी-नियंत्रणकर्ता, कुण्डी-तपोमय, विकुर्वण-सृष्टीचक्र फिरवणारा.

**भावार्थ :** शिव सर्वांचा छत्रछाया आहेत. ते भक्तांचे रक्षण करतात. त्यांचे स्वरूप बाह्यतः विरूप दिसते, पण तेच परमसौंदर्य आहे. ते कर्म, तप आणि सृष्टीच्या गतीचे नियंता आहेत.

**(१०२) हर्यक्षः ककुभो वज्रो शतजिह्वः सहस्त्रपात।**
**सहस्त्रमूर्धा देवेन्द्रः सर्वदेवमयो गुरुः॥**

**अर्थ :** हर्यक्ष-सुवर्ण नेत्रधारी, ककुभ-दिशांचा अधिपती, वज्र-दृढतेचे प्रतीक, सहस्त्रमूर्ध-सहस्र रूपांत प्रकट, गुरुः-परम शिक्षक.

**भावार्थ :** शिव हे सहस्त्ररूपात सर्वत्र प्रकट आहेत. ते वज्रासारखे दृढ आणि सत्याच्या दिशांचा अधिपती आहेत. तेच सर्व देवतांचे गुरू आहेत. कारण त्यांच्यातूनच ज्ञान प्रवाहीत होते.

**(१०३) सहस्त्रबाहुः सर्वाङ्गः शरण्यः सर्वलोककृत।**
**पवित्रं त्रिककुन्मन्त्रः कनिष्ठः कृष्णपिङ्गलः॥**

**अर्थ :** सहस्त्रबाहु-असंख्य हातांनी कार्य करणारा, सर्वाङ्ग-सर्वांगपूर्ण, शरण्य-आश्रयदायक, त्रिककुन्मन्त्र-त्रिकाल ज्ञानाचा अधिपती, कृष्णपिङ्गल-काळसर आणि सुवर्णमिश्र वर्णाचा.

**भावार्थ :** शिवाचे सहस्र हात म्हणजे सर्व कर्मांत त्यांचा सहभाग आहे. तेच विश्वाचे पालनकर्ते आणि आश्रयदाता आहेत. त्यांचा त्रिकालदर्शी दृष्टिकोन भक्ताला भूत, वर्तमान, भविष्य यांचे ज्ञान देतो.

**(१०४) ब्रह्मदण्डविनिर्माता शतघ्नीपाशशक्तिमान।**
**पद्मगर्भो महागर्भो ब्रह्मगर्भो जलोद्भवः॥**

**अर्थ :** ब्रह्मदण्डविनिर्माता-सृष्टीचे नियम रचणारा, शक्तिमान-सामर्थ्यसंपन्न, पद्मगर्भ-कमलातून उत्पन्न सृष्टीचा स्वामी, जलोद्भव-जलातून प्रकट झालेला आद्यतत्त्व.

**भावार्थ :** शिव हे ब्रह्माचे मूळ आहेत. ते सृष्टीचे नियम ठरवतात आणि सृष्टीला स्थैर्य देतात. ते कमलासारखे निर्मळ आणि जलासारखे जीवनदायी आहेत.

**(१०५) गभस्तिर्ब्रह्मकृद्ब्रह्मी ब्रह्मविद्ब्राह्मणो गतिः।**
**अनन्तरूपो नैकात्मा तिग्मतेजाः स्वयम्भुवः॥**

**अर्थ :** गभस्ति-सूर्यकिरणासारखे प्रकाशमान, ब्रह्मकृद-सृष्टीचा निर्माता, अनन्तरूप-अनंत स्वरूप, तिग्मतेज-तेजस्वी आणि स्वयंज्योत्स्ना.

**भावार्थ :** शिव हे ब्रह्मज्ञानाचे स्रोत आहेत. ते अनंत रूपात प्रकट होत असतात आणि स्वतः प्रकाश स्वरूप आहेत. तेच सर्व मार्गांचे अंतिम ध्येय आहेत.

**(१०६) ऊर्ध्वगात्मा पशुपतिर्वातरंहा मनोजवः।**
**चन्दनी पद्मनालाग्रः सुरभ्युत्तरणो नरः॥**

**अर्थ :** ऊर्ध्वगात्मा-आत्म्याला उन्नती देणारा, पशुपति-सर्व जीवांचा स्वामी, वातरंहा-वायूप्रमाणे वेगवान, मनोजव-विचारांच्या वेगाचा अधिपती, सुरभ्युत्तरण-दिव्य सुगंधित गुणांचा वाहक.

**भावार्थ :** शिव हे आत्म्याला उन्नती देणारे आहेत. ते पशुपती म्हणून सर्व जीवांना संरक्षण देतात. त्यांचा वायूप्रमाणे वेग आणि मनोजव तेज हे ज्ञानाची गती वाढवते.

**(१०७) कर्णिकारमहास्त्रग्वी नीलमौलिः पिनाकधृत।**
**उमापतिरुमाकान्तो जाह्नवीधृगुमाधवः॥**

**अर्थ :** कर्णिकारमहास्त्रग्वी-सुवर्णपुष्पमाला धारण करणारा, नीलमौलि-नीलकंठधारी, पिनाकधृत-धनुर्धारी, उमापति-पार्वतीचे पति, जाह्नवीधृग-गंगाधर.

**भावार्थ :** शिव हे प्रेम, ज्ञान आणि संतुलनाचे मूर्त रूप आहेत. ते नीलकंठ म्हणून विषपान करून विश्वाचे रक्षण करतात. ते उमेश्वर असून कृपा, सौंदर्य आणि ज्ञानाचे अधिष्ठान आहेत.

**(१०८) वरो वराहो वरदो वरेण्यः सुमहास्वनः।**
**महाप्रसादो दमनः शत्रुहा श्वेतपिङ्गलः॥**



**अर्थ :** वरो-वरदानदाता, वराह-शक्तिरूप, वरेण्य-सर्वोच्च, महाप्रसाद-कृपालु, शत्रुहा-दुःखनाशक.

**भावार्थ :** शिव हे सर्वश्रेष्ठ वरदान देणारे आहेत. ते शत्रू (अर्थात अज्ञान आणि पाप) यांचा नाश करतात. त्यांचा महाप्रसाद म्हणजे भक्तासाठी मोक्षदायी कृपा.

**(१०९) पीतात्मा परमात्मा च प्रयतात्मा प्रधानधृत।**
**सर्वपार्श्वमुखस्त्र्यक्षो धर्मसाधारणो वरः॥**

**अर्थ :** पीतात्मा-प्रकाशमय आत्मा, परमात्मा-सर्वश्रेष्ठ आत्मा, त्र्यक्ष-तीन नेत्रांचा अधिपती, धर्मसाधारण-धर्माचे पालन करणारा.

**भावार्थ :** शिव परमात्मस्वरूप आहेत. ते सर्वत्र विद्यमान आहेत. ते धर्माचे मूर्त स्वरूप असून त्रिनेत्ररूपाने ज्ञान, कृती आणि इच्छाशक्तीचे प्रतीक आहेत. तेच सत्याचे पालनकर्ते आणि योगमार्गाचे दाता आहेत.

**(११०) चराचरात्मा सूक्ष्मात्मा अमृतो गोवृषेश्वरः।**
**साध्यर्षिर्वसुरादित्यो॥**

**अर्थ :** चराचरात्मा-सर्व गतिमान व स्थिर घटकांतील चेतना, सूक्ष्मात्मा-सूक्ष्मातिसूक्ष्म रूपात वास करणारा, अमृत-अमरत्वाचे मूळ, गोवृषेश्वर-धर्मरूपी वृषभाचा स्वामी.

**भावार्थ :** शिव हे सर्व चराचर सृष्टीत वास करणारे सूक्ष्म आत्मा आहेत. ते धर्माचे रक्षण करतात आणि अमृताचे अधिपती आहेत. त्यांचे स्वरूप विश्वाच्या प्रत्येक अणूत प्रकट आहे. तेच सर्वांचे आत्मतत्त्व.

**(१११) व्यासः सर्गः सुसङ्क्षेपो विस्तरः पर्ययो नरः।**
**ऋतु संवत्सरो मासः पक्षः सङ्ख्यासमापनः॥**

**अर्थ :** व्यासः-ज्ञानसंहितेचा विस्तार करणारा, सर्गः-सृष्टीचा निर्माता, संवत्सर-कालचक्राचा अधिपती, मास, पक्ष-काळाचे विभागक.

**भावार्थ :** शिव हे काळाचे मूळ आहेत. ते सृष्टी, संवत्सर, ऋतू, मास, पक्ष यांचे संचालन करतात. त्यांचे ज्ञान वेदव्यासाप्रमाणे सर्व विषयांचा सार आहे त्यांनीच काळ आणि सृष्टी निर्माण केली.

**(११२) कला काष्ठा लवा मात्रा मुहूर्ताहःक्षपाः क्षणाः।**
**विश्वक्षेत्रं प्रजाबीजं लिङ्गमाद्यस्तु निर्गमः॥**

**अर्थ :** कला-काष्ठा-लवा-कालाचे सूक्ष्म विभाग, मुहूर्त-शुभकाळ, विश्वक्षेत्र-संपूर्ण विश्व, लिंग-सृष्टीचे मूलतत्त्व.

**भावार्थ :** शिव हे प्रत्येक क्षणाचे नियंता आहेत. त्यांच्या शिवलिंगरूपातूनच विश्वाची सृष्टी होते आणि प्रलयावेळी त्यातच विश्व विलीन होते. तेच सर्व क्षण, काळ आणि जीवनाचे केंद्रबिंदू आहेत.

**(११३) सदसद्व्यक्तमव्यक्तं पिता माता पितामहः।**
**स्वर्गद्वारं प्रजाद्वारं मोक्षद्वारं त्रिविष्टपम॥**

**अर्थ :** सत-असत्- सत्य आणि असत्य दोन्हींचे अधिष्ठान, पिता-माता -सृष्टीचे जनक-जननी, स्वर्गद्वार, मोक्षद्वार-उन्नतीचे मार्गदर्शक.

**भावार्थ :** शिव हे सर्व सृष्टीचे पित्य आहेत, आणि शक्तीस्वरूपा पार्वती माता आहेत. तेच कर्माच्या फळानुसार स्वर्ग, पृथ्वी आणि मोक्षाचे द्वार उघडतात. सत-असत दोन्हींचा तोल राखून ते विश्वात संतुलन निर्माण करतात.

**(११४) निर्वाणं ह्लादनश्चैव ब्रह्मलोकः परा गतिः।**
**देवासुरविनिर्माता देवासुरपरायणः॥**

**अर्थ :** निर्वाण-मुक्तीचे स्वरूप, ह्लादन-आनंदमय, देवासुरविनिर्माता-देव-दानवांचे निर्माणकर्ता.

**भावार्थ :** शिव हे निर्वाणाचे मूर्त स्वरूप आहेत. त्यांचे स्मरण सर्व दुःख नष्ट करून आनंद देते. ते देव-दानव दोघांचेही स्वामी असून सर्वांना समभावाने चालवतात.

**(११५) देवासुरगुरुर्देवो देवासुरनमस्कृतः।**
**देवासुरमहामात्रो देवासुरगणाश्रयः॥**

**अर्थ :** देवासुरगुरू-देव-दानवांचा गुरू, देवो-देवतांचा देव, महामात्र-सर्वांना प्रेरणादाता.

**भावार्थ :** शिव हे निष्पक्ष मार्गदर्शक आहेत. त्यांनी देव-दानव दोघांना एकसमान न्याय दिला. ते गुरू असून सर्व शक्तींना संतुलन देतात. त्यांची उपासना सर्वांनाच दैवी शक्ती प्रदान करते.

**(११६) देवासुरगणाध्यक्षो देवासुरगणाग्रणीः।**
**देवातिदेवो देवर्षिर्देवासुरवरप्रदः॥**

**अर्थ :** गणाध्यक्ष-सर्व गणांचे अधिपती, देवातिदेव-देवांपेक्षाही श्रेष्ठ, वरप्रद-सर्व इच्छांची पूर्ती करणारा.

**भावार्थ :** शिव हे देवगण आणि दैवी शक्तींचे नियंता आहेत. ते देवतांनाही वरदान देतात, म्हणून त्यांना 'देवातिदेव' म्हणतात. ते सर्वांच्या इच्छांची पूर्ती करतात आणि दुष्टांचा नाश करतात.

**(११७) देवासुरेश्वरो विश्वो देवासुरमहेश्वरः।**
**सर्वदेवमयोऽचिन्त्यो देवतात्माऽऽत्मसम्भवः॥**

**अर्थ :** देवासुरेश्वर-देव-दानवांचा ईश्वर, महेश्वर-सर्वश्रेष्ठ प्रभू, अचिन्त्य-विचारातीत.

**भावार्थ :** शिव हे देव आणि असुर दोघांवर अधिष्ठित आहेत. त्यांचे स्वरूप अचिन्त्य, अपरिमेय आणि निर्गुण आहे. ते सर्व देवतांमध्ये वास करतात आणि आत्मस्वरूपात प्रकट होतात.

**(११८) उद्भित्त्रिविक्रमो वैद्यो विरजो नीरजोऽमरः।**
**ईड्यो हस्तीश्वरो व्याघ्रो देवसिंहो नरर्षभः॥**

**अर्थ :** त्रिविक्रम-तीन पाताळांत व्यापणारा, वैद्य-रोगनाशक, विरज-रजोगुणापासून मुक्त, व्याघ्र-शक्तिमान, देवसिंह-पराक्रमी.

**भावार्थ :** शिव त्रिविक्रमरूपाने सर्वत्र व्यापलेले आहेत. ते रोग, दुःख आणि अहंकाराचे नाशक आहेत. ते देवसिंह असून दुष्टांचा संहार करतात आणि साधकाचे रक्षण करतात.

**(११९) विबुधोऽग्रवरः सूक्ष्मः सर्वदेवस्तपोमयः।**
**सुयुक्तः शोभनो वज्री प्रासानां प्रभवोऽव्ययः॥**

**अर्थ :** विबुध-ज्ञानी, सूक्ष्म-सूक्ष्म चेतनेचा अधिपती, तपोमय-तपस्वी, वज्री-दृढसंकल्पी, अव्यय-अविनाशी.

**भावार्थ :** शिव हे ज्ञान, तप आणि दृढतेचे मूर्त स्वरूप आहेत. ते सूक्ष्म चेतनेच्या माध्यमातून सर्वत्र वास करतात.
त्यांचे तपोबल अटळ आणि त्यांच्या इच्छाशक्तीला मर्यादा नाहीत.

**(१२०) गुहः कान्तो निजः सर्गः पवित्रं सर्वपावनः।**
**शृङ्गी शृङ्गप्रियो बभ्रू राजराजो निरामयः॥**

**अर्थ :** गुह-अंतर्मनात वास करणारा, कान्त-सर्वांना प्रिय, सर्वपावन-शुद्धता देणारा, राजराज-राजांचा राजा, निरामय-रोगरहित.

**भावार्थ :** शिव अंतर्मनात वास करून साधकाला पवित्र करतात. तेच राजांचा राजा आहेत. कारण त्यांचे राज्य अहंकारावर आहे. त्यांची कृपा म्हणजे रोग, दुःख आणि क्लेशांचा अंत. शिव हेच निर्वाण, धर्म आणि पावित्र्याचे प्रतीक आहेत.

**क्रमशः**

# महादेवांच्या पिंडीवरील सात महत्त्वपूर्ण स्थाने

महादेवांचा अभिषेक करताना महादेवाच्या पिंडीवरील सात महत्त्वाची स्थाने आपल्याला माहीत असणे गरजेचे आहे.



१) पहिले स्थान हे उजव्या चरणावरील श्रीगणेशांचे स्थान आहे.
२) दुसरे स्थान हे डाव्या चरणावरील श्री कार्तिकेय यांचे स्थान आहे.
३) तिसरे स्थान हे भगवान गणेश व भगवान कार्तिकेय या दोघांच्या मधोमध महादेवांची लहान मुलगी अशोक सुंदरी हिचे स्थान आहे.
४) चौथे स्थान पिंडीच्या खालचा चपटा भाग माता पार्वतीचा आहे. या भागाला हळद, कुंकू वाहावे.
५) पिंडीचे पाचवे स्थान हे स्वतः भगवान शंकराचे आहे. या भागाला पूजन करताना गंध, अष्टगंध वाहावा.
६) पिंडीचे सहावे स्थान हे ३३ कोटी देवी-देवतांचे स्थान आहे. या ठिकाणाहून बाहेर पडलेले अभिषेकाचे तीर्थ हे भगवान शंकर व माता पार्वतींच्या अभिषेकासह ३३ कोटी देवांचे आशीर्वाद प्राप्त झालेले तीर्थ असते. म्हणून या स्थानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.
७) सातवे स्थान महादेवाच्या पिंडीवर जी जलाधारी, कलश किंवा गळतीपात्र अभिषेकासाठी असते. त्या पात्रात भगवान शंकर यांच्या पाच मुलींचे स्थान आहे.

# नव्याची पुनव



माघ पौर्णिमेस 'नव्याची पुनव' म्हणतात. नव्याची म्हणजे नवीन धान्याची. भूमीविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा हा शेतीशी संबंधित असाच सण आहे. पश्चिम महाराष्ट्रात शेतात पिकलेल्या नवीन धान्याची मुठीच्या आकाराची पेंढी एक किंवा दोन आणतात. त्या घराच्या दाराजवळ बांधतात. मग मातीच्या पाच चपट्या मूर्ती तयार करून उंब-याजवळ सारवलेल्या जमिनीवर त्या ठेवतात. अंगणात नवीन धान्याची नैवेद्य शिजविला जातो. या मूर्तींना आणि ग्रामदेवतेला दाखवितात. ज्वारीची पाच ताटे आणतात. त्यांच्या टोकाला गाठ मारतात. गव्हाच्या पाच मुठीएवढ्या पेंढ्या तेथे ठेवल्या जातात. या ताटात कणकेचे पाच दिवे करून लावतात व त्यांची पूजा करतात. त्याशिवाय नवीन आलेले धान्य खायचे नाही, अशी पद्धत आहे. काही ठिकाणी धान्याची एक पेंढी रानातच एका मेढीला बांधून ठेवतात. त्या मेढीची पूजा करून तिला धान्याचे पाच दाणे आणि नव्या धान्याचा नैवेद्य दाखवितात. काही शेतकरी धान्याचे खळे करतानाच खळ्याच्या मध्यभागी पेंढी पूजतात व मगच खळे करण्यास प्रारंभ करतात.

# माघ पौर्णिमेस हिंदू धर्मात विशेष महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

माघ पौर्णिमेस हिंदू धर्मात आध्यात्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. या पौर्णिमेविषयीची महत्त्वपूर्ण माहिती जाणून घ्यायलाच हवी.

### १) माघ पौर्णिमेचे महत्त्व

माघ महिन्यात येणाऱ्या या पौर्णिमेला 'माघी पौर्णिमा' असेही म्हणतात. असे मानले जाते, की या दिवशी सर्व पवित्र नद्यांमध्ये देवांचा वास असतो. या दिवशी स्नान आणि दान केल्याने पुण्यप्राप्ती होते आणि ग्रहांचे दोष निवारण्यास मदत होते.

### २) धार्मिक विधी आणि परंपरा

**पवित्र स्नान :** सूर्योदयावेळी नदीत किंवा शक्य नसल्यास घरातच गंगेचे पाणी मिसळून स्नान करणे अत्यंत शुभ मानले जाते.
**सत्यनारायण पूजा :** अनेक घरांमध्ये या दिवशी श्री सत्यनारायणाची कथा वाचली जाते.
**दानधर्म :** या दिवशी तीळ, गूळ, अन्न आणि वस्त्रांचे दान करणे फलदायी मानले जाते.
**चंद्रदर्शन :** सायंकाळी चंद्राला अर्घ्य दिल्याने मानसिक शांती मिळते.

### ३) विशेष योग

या दिवशी 'माघ स्नान' समाप्ती होते. जे भाविक महिनाभर माघ स्नान करतात त्यांच्यासाठी हा दिवस उत्सवाचा असतो. दक्षिण भारतात या दिवशी अनेक मंदिरांमध्ये 'तेपोत्सव' साजरा केला जातो.

# तब्बल १६२ वर्षांनंतर माघी पौर्णिमेचा महायोग!

## 'हे' ३ उपाय पालटतील नशीब; चुकवू नका ही सुवर्णसंधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी माघी पौर्णिमेला एक दुर्मिळ योग जुळून आला. या दिवशी आपल्या भाग्याला कलाटणी देणारे ३ उपाय आवर्जून करता येतील. माघी पौर्णिमा ही अत्यंत दुर्मिळ आणि फलदायी ठरणारी आहे. तब्बल १६२ वर्षांनंतर या दिवशी 'रविपुष्य' आणि 'सर्वार्थ सिद्धी' योगाचा सुवर्णसंगम होईल. या विशेष पर्वाचे महत्त्व आणि या दिवशी करायचे ३ प्रभावी उपाय वाचा.

ज्योतिषशास्त्रानुसार माघी पौर्णिमेचा येणारा पुष्य नक्षत्र योग म्हणजेच 'रविपुष्य योग' हा सर्व कार्यांत यश देणारा मानला जातो. यंदा १ फेब्रुवारी रोजी पहाटे ५:३२ मिनिटांनी पौर्णिमा तिथी सुरू झाली. या दिवशी रविपुष्यासह सर्वार्थ सिद्धी योग जुळून आल्याने याचे आध्यात्मिक महत्त्व कित्येक पटीने वाढले आहे.
या महायोगाचा पूर्ण लाभ घेण्यासाठी खालील ३ उपाय आवर्जून करावेत.



### १) स्नान आणि नामस्मरण : नकारात्मकता होईल दूर

पौर्णिमेच्या दिवशी सकाळी स्नानाच्या पाण्यात थोडे गंगाजल आणि काळे तीळ टाकावे. स्नान करत असताना 'ओम विष्णवे नमः' या मंत्राचा १०८ वेळा जप करावा. काळे तीळ नकारात्मकता शोषून घेतात, तर गंगाजल आणि विष्णू मंत्राच्या प्रभावाने तुमच्याभोवती एक सकारात्मक ऊर्जावलय तयार होते.

### २) गूळ दान : सूर्य तेजाची प्राप्ती

रविपुष्य योगाचा स्वामी सूर्य आहे. कुंडलीतील रवी (सूर्य) ग्रह बलवान करण्यासाठी आणि समाजात मानसन्मान मिळविण्यासाठी हा उत्तम दिवस आहे. या दिवशी जवळच्या मंदिरात जाऊन गरजू व्यक्तीला गूळ दान करावा. या उपायामुळे तुमचे व्यक्तिमत्व अधिक प्रगल्भ होते आणि आत्मबळ वाढते.

### ३) चंद्राची शीतल छाया : आरोग्याचा अमृतयोग

पौर्णिमेच्या रात्री तांदळाची खीर तयार करावी आणि ती काही वेळ चंद्रप्रकाशात ठेवावी. असे मानले जाते, की माघी पौर्णिमेच्या रात्री चंद्राच्या किरणांमधून अमृत वर्षाव होतो. ही खीर ग्रहण केल्याने आरोग्याच्या तक्रारी दूर होतात आणि सर्वार्थ सिद्धी योगामुळे तुम्हाला प्रत्येक क्षेत्रात यश प्राप्ती होते.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)